**Reg. No. NP CITY/236/2015-17**
Published on 7th July 2016.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

**वर्ष २, अंक २६]** **गुरुवार ते बुधवार, जून ३०-जुलै ६, २०१६/आषाढ ९-१५, शके १९३८** **[पृष्ठे १४, किंमत : रुपये ११.००**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना.वि.पु.), म.शा.रा., अ. क्र. ११७.

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक २९ जून, २०१६.

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.—**

क्रमांक टिपीएस-२४१५-३६-प्र.क्र. १८-२०१५-नवि-९.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना, शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक टिपीएस-२४९६-२६४३-प्र. क्र. ३०० (अ)-९७-नवि-९, दि. ७ जानेवारी, २००० अन्वये भागशः मंजूर व क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र. क्र. २००-२०००-नवि-९, दि. १० सप्टेंबर, २००१ नुसार अंतिमतः मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दिनांक १ मार्च २००० व दिनांक २१ सप्टेंबर, २००१ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्रमांक टिपीएस-२४०१-८५५-प्र. क्र. ७६-२०००-नवि-९, दिनांक २७ फेब्रुवारी, २००२ अन्वये सात योजनांकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे, (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजे भरतवाडा येथील खसरा क्रमांक ५९, ६२ व ६४ भाग मधील ३.५७ हेक्टर क्षेत्र आरक्षण क्रमांक एम.ई.-९७ वाणिज्य संकुलामध्ये समाविष्ट आहेत (यापुढे "उक्त क्षेत्र" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना नियोजन प्राधिकरण (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे संबोधले आहे) म्हणून त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक १३-११०२, दिनांक २९ नोव्हेंबर २०११ नुसार, उक्त क्षेत्र वाणिज्य संकुल ऐवजी रहिवास विभाग असे बदलण्याचे ठरवून, त्याअनुषंगाने, उक्त अधिनियमामध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर केलेला आहे (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त क्षेत्र वाणिज्य संकुलातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतचा उक्त फेरबदल प्रस्ताव, काही अटींच्या अधिन राहून मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

*Condition No. 4.*–If the land is proposed to be developed by way of plotted layout, then sale of plots under such layout shall be monitored by the Chairman, Nagpur Improvement Trust, Nagpur in relation to development of basic amenities as per the stages given below.

(a) After final approval of layout .. Sale of 25% of the total plots shall be permissible

(b) After completion of 40% basic Amenities .. Sale of 50% of the total plots shall be permissible

(c) After completion of 60% basic Amenities .. Sale of 75% of the total plots shall be permissible

(d) After completion of 80% basic Amenities .. Sale of 90% of the total plots shall be permissible

(b) After completion of 100% basic Amenities .. Sale of 100% of the total plots shall be permissible

*Condition No. 5.*–If Group Housing Scheme is proposed in the layout, then occupation certificate shall not be given Chairman, Nagpur Improvement Trust, Nagpur unless all the basic amenities are fully developed.

In case of non-compliance, Layout Approval and Non-Agricultural permission shall be liable to be cancelled."

A copy of the part plan of the aforesaid sanctioned modification shall be available for public inspection in the office of the Chairman, Nagpur Improvement Trust, Nagpur, during office hours on all working days for a period of one month.

This Notification shall also be available on the Govt. web site *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. S. CHOUHAN,

Section Officer.

---

भाग १-अ (ना.वि.पु.), म.शा.रा., अ. क्र. ११९.

## नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून, २०१६.

क्र. एमआरडी-३३१६/प्र.क्र. २४/(१)/नवि-७.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस-१८९९/११९१/प्र.क्र ८०/९९/नवि-१३, दि. २३ जुलै, १९९९ अन्वये नागपूर महानगर क्षेत्र व त्याचे क्षेत्र घोषित करण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. नासुप्र-३३१३/प्र.क. ४१/नवि-०७, दिनांक ३० जानेवारी, २०१४ अन्वये मेट्रो रेल्वे (कन्स्ट्रक्शन ऑफ वर्कस) अधिनियम, १९७८ (१९७८ चा ३३) खाली केंद्र शासनाच्या मान्यतेने नागपूर महानगर क्षेत्रात मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्याचा उद्देश घोषित करून नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या " (१) ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) " व " (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) " या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांस मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाच्या पत्र क्र. के-१४०११(एन-१) २०१४ एमआरटीएस, दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ अन्वये, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या " (१) ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) " व " (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) " या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांस मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाची अधिसूचना क्र. एसओ क्र. २४४४(इ), दिनांक १८ सप्टेंबर, २०१४ अन्वये मेट्रो रेल्वे (कन्स्ट्रक्शन ऑफ वर्कस) अधिनियम, १९७८ (१९७८ चा ३३) (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) नागपूर महानगर क्षेत्रास लागू करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाची अधिसूचना क्र. एसओ क्र. २७३(इ), दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या अनुसूचीत नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या " (१) ऑटोमोटीव्ह चौक ते खापरी (उत्तर-दक्षिण मार्गिका) " व " (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) " या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांचा समावेश केला आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. नासुप्र-३३१३/प्र.क्र. ४१/नवि-०७, दिनांक ३० जानेवारी, २०१४ अन्वये नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या " (१) ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) " व " (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) " या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांच्या प्रकल्पास " निकडीचा सार्वजनिक प्रकल्प व महत्त्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प " घोषित करण्यास मान्यता दिली आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र शासन सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७ नुसार सुधारित केलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२४ ब (२-१ अ) च्या प्रयोजनार्थ नागपूर महानगर प्रदेशातील नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या " (१) ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) " व " (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) " या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांच्या प्रकल्पास " महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प " घोषित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**श्रीराम यादव,**
उपसचिव.

---

भाग १-अ (ना.वि.पु.), म.शा.रा., अ. क्र. १२०.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 30th June, 2016.

No. MRD-3316/C.R. 24/(1)/UD-7.—

Whereas, the Government of Maharashtra has declared Nagpur Metropolitan region and its area *vide* Urban Development Department Notification No. TPS/1899/191/C.R. 80/99/UD-13, dated 23rd July 1999 ;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Urban Development Department GR No. NASUPRA-3313/C.R.-41/UD 07, dated 30th January 2014 has sanctioned the metro rail project consisting two corridors (1) Automotive square to Mihan (North-South Corridor) and (2) Prajapati Nagar to Lokmanyanagar (East-West Corridor) in Nagpur Metropolitan Region and declared its intention to implement these metro corridors under the Metro Railways (Construction of Works) Act, 1978 (33 of 1978), (hereinafter referred to as the said Act) with the approval of the Central Government ;

And whereas, the Central Government in the Ministry of Urban Development, *vide* Letter No. K-14011/1(N-1)/2014-MRTS, dated 21st August, 2014 has approved the metro rail project consisting two corridors (1) Automotive square to Mihan (North-South Corridor) and (2) Prajapati Nagar to Lokmanyanagar (East-West Corridor) in Nagpur Metropolitan Region.

And whereas, the Central Government in the Ministry of Urban Development, *vide* Notification No. S.O. 2444(E), dated 18th September, 2014 has extended the Metro Railways (Construction of Works) Act, 1978 (33 of 1978), (hereinafter referred to as the said Act), to the Nagpur Metropolitan Region ;

And whereas, the Central Government in the Ministry of Urban Development, *vide* Notification No. S.O. 273(E), dated 20th October, 2014 has added the Nagpur Metro Rail alignments (1) Nagpur Metro North-South Corridor (Automotive square to Khapari) and (2) Nagpur Metro East-West Corridor (Prajapati Nagar to Lokmanyanagar) to the scheduled of the said Act ;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Urban Development Department GR No. NASUPRA-3313/C.R.-41/UD-07, dated 30th January 2014 has sanctioned to declare the Metro Rail Project consisting two corridors (1) Automotive square to Mihan (North-South Corridor) and (2) Prajapati Nagar to Lokmanyanagar (East-West Corridor) in Nagpur Metropolitan Region as "Essential Public Project and Vital Urban Transport Project".

Now, therefore, the Government of Maharashtra declares the Metro Rail Project consisting two corridors (1) Automotive square to Mihan (North-South Corridor) and (2) Prajapati Nagar to Lokmanyanagar (East-West Corridor) in Nagpur Metropolitan Region as "Vital Urban Transport Project" for purpose of section 124B (2-1A) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 as amended by Mah. Act. No. XXXVII of 2015.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. D. YADAV,
Deputy Secretary.

---

भाग १-अ (ना.वि.पु.), म.शा.रा., अ. क्र. १२१.

## नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २०१६.

क्र. एमआरडी-३३१६/प्र.क्र. २४/(२)/नवि-७.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस-१८९९/११९१/प्र.क्र ८०/९९/नवि-१३, दि. २३ जुलै, १९९९ अन्वये नागपूर महानगर क्षेत्र व त्याचे क्षेत्र घोषित करण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. नासुप्र-३३१३/प्र.क. ४१/नवि-०७, दिनांक ३० जानेवारी, २०१४ अन्वये मेट्रो रेल्वे (कन्स्ट्रक्शन ऑफ वर्कस) अधिनियम, १९७८ (१९७८ चा ३३) खाली केंद्र शासनाच्या मान्यतेने नागपूर महानगर क्षेत्रात मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्याचा उद्देश घोषित करून नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या " (१) ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) " व " (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) " या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांस मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाच्या पत्र क्र. के-१४०११(एन-१) २०१४ एमआरटीएस, दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ अन्वये, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या " (१) ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) " व " (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) " या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांस मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाची अधिसूचना क्र. एसओ क्र. २४४४(इ), दिनांक १८ सप्टेंबर, २०१४ अन्वये मेट्रो रेल्वे (कन्स्ट्रक्शन ऑफ वर्कस) अधिनियम, १९७८ (१९७८ चा ३३) (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) नागपूर महानगर क्षेत्रास लागू करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयाची अधिसूचना क्र. एसओ क्र. २७३(इ), दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या अनुसूचीत नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या " (१) ऑटोमोटीव्ह चौक ते खापरी (उत्तर-दक्षिण मार्गिका) " व " (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) " या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांचा समावेश केला आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास शासन निर्णय क्र. नासुप्र-३३१३/प्र.क्र. ४१/नवि-०७, दिनांक ३० जानेवारी, २०१४ अन्वये नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या " (१) ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) " व " (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) " या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांच्या प्रकल्पास " निकडीचा सार्वजनिक प्रकल्प व महत्त्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प " घोषित करण्यास मान्यता दिली आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र शासन सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३५ नुसार सुधारित केलेल्या महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमाच्या कलम १४९-ब च्या प्रयोजनार्थ नागपूर महानगर प्रदेशातील नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या " (१) ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) " व " (२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) " या दोन उन्नत मेट्रो रेल्वे मार्गिकांच्या प्रकल्पास " महत्त्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प " घोषित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**श्रीराम यादव,**
उपसचिव.

भाग १-अ (ना.वि.पु.), म.शा.रा., अ. क्र. १२२.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 30th June, 2016.

No. MRD-3316/C.R. 24/(2)/UD-7.—

Whereas, the Government of Maharashtra has declared Nagpur Metropolitan region and its area *vide* Urban Development Department Notification No. TPS/1899/191/C.R. 80/99/UD-13, dated 23rd July 1999 ;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Urban Development Department GR No. NASUPRA-3313/C.R.-41/UD 07, dated 30th January 2014 has sanctioned the Metro Rail Project consisting two corridors (1) Automotive square to Mihan (North-South Corridor) and (2) Prajapati Nagar to Lokmanyanagar (East-West Corridor) in Nagpur Metropolitan Region and declared its intention to implement these metro corridors under the Metro Railways (Construction of Works) Act, 1978 (33 of 1978), (hereinafter referred to as the said Act) with the approval of the Central Government ;

And whereas, the Central Government in the Ministry of Urban Development, *vide* Letter No. K-14011/1(N-1)/2014-MRTS, dated 21st August, 2014 has approved the metro rail project consisting two corridors (1) Automotive square to Mihan (North-South Corridor) and (2) Prajapati Nagar to Lokmanyanagar (East-West Corridor) in Nagpur Metropolitan Region.

And whereas, the Central Government in the Ministry of Urban Development, *vide* Notification No. S.O. 2444(E), dated 18th September, 2014 has extended the Metro Railways (Construction of Works) Act, 1978 (33 of 1978), (hereinafter referred to as the said Act), to the Nagpur Metropolitan Region ;

And whereas, the Central Government in the Ministry of Urban Development, *vide* Notification No. S.O. 273(E), dated 20th October, 2014 has added the Nagpur Metro Rail alignments (1) Nagpur Metro North-South Corridor (Automotive square to Khapari) and (2) Nagpur Metro East-West Corridor (Prajapati Nagar to Lokmanyanagar) to the scheduled of the said Act ;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Urban Development Department GR No. NASUPRA-3313/C.R.-41/UD-07, dated 30th January 2014 has sanctioned to declare the Metro Rail Project consisting two corridors (1) Automotive square to Mihan (North-South Corridor) and (2) Prajapati Nagar to Lokmanyanagar (East-West Corridor) in Nagpur Metropolitan Region as "Essential Public Project and Vital Urban Transport Project".

Now, therefore, the Government of Maharashtra declares the Metro Rail Project consisting two corridors (1) Automotive square to Mihan (North-South Corridor) and (2) Prajapati Nagar to Lokmanyanagar (East-West Corridor) In Nagpur Metropolitan Region as " Vital Important Urban Transport Project" for the purpose of section 149B of the Maharashtra Municipal Corporations Act as amended by Mah. Act No. XXXV of 2015.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. D. YADAV,
Deputy Secretary.

---

भाग १-अ (ना.वि.पु.), म.शा.रा., अ. क्र. १२३.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**वाचा**:—(१) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४ ब (१).

(२) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचे आदेश क्रमांक एसईसी-१०९५-१०१-डेक्स-३ दिनांक ७ फेब्रुवारी, १९९५ (महाराष्ट्र शासन राजपत्र).

(३) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचे आदेश क्रमांक रानिआ-जिपपंस-२०१०-प्र. क्र. ९-का-७ दिनांक १९ नोव्हेंबर २०१० (महाराष्ट्र शासन राजपत्र).

(४) तहसिलदार मोहाडी यांचे पत्र क्रमांक अका-ग्रापनि-कावि-३५ दिनांक २१ जानेवारी २०१६.

(५) तहसिलदार लाखांदूर यांचे पत्र क्रमांक कलि-ग्रापनि-कावि-३० दिनांक २१ जानेवारी २०१५.

(६) तहसिलदार साकोली यांचे पत्र क्रमांक अका-ग्रापनि-कावि-८६ दिनांक २२ जानेवरी २०१६.

(७) तहसिलदार भंडारा यांचे पत्र क्रमांक कलि-निवडणूक-कावि-१३ दिनांक १२ जानेवारी २०१६.

(८) तहसिलदार लाखनी यांचे पत्र क्रमांक अका-ग्रापनि-कावि-८३ दिनांक २७ जानेवारी २०१६.

(९) तहसिलदार पवनी यांचे पत्र क्रमांक सानि-कावि-३० दिनांक २५ नोव्हेंबर २०१५ प्राप्त दिनांक १४ जानेवारी २०१६.

(१०) तहसिलदार तुमसर यांचे पत्र क्रमांक कलि-ग्रापनि-कावि-६९ दिनांक २१ जानेवारी २०१६.

**आदेश**

(पारित दिनांक २३ जुन, २०१६)

क्रमांक अका-ग्रापंनि-कावि-२८४-२०१६.—

१. ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४ ब (१) अन्वये ज्या उमेदवारानी ग्रामपंचायती निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाचा हिशोब विहित रितीने व विहित मुदतीत सादर केलेला नाही, अशा उमेदवांराना ग्रामपंचायत सदस्य म्हणून राहण्यास किंवा असा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास पुढील पाच वर्षाकरिता निरर्ह ठरविणेची तरतुद आहे.

२. आणि त्याअर्थी, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचेकडील वाचा मधील क्रमांक ३ अन्वये ग्रामपंचायत सार्वत्रिक/पोट निवडणुका लढविणा-या उमेदवारांनी निवडणुक खर्चाची माहिती शपथपत्रासह मा. राज्य निवडणुक आयोगाने विहित केल्यानुसार निकाल जाहिर झाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीमध्ये सादर न केल्यास अशा उमेदवारांना निरर्ह ठरविण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत.

३. त्यानुषंगाने तहसिलदार यांनी त्यांचे संदर्भिय क्रमांक (४) ते (१०) अन्वये ग्रामपंचायत निवडणुक जुलै २०१५, मधील निवडणुक लढविलेल्या ज्या उमेदवारांनी निवडणुकीत केलेल्या खर्चाबाबतचे शपथपत्र विहित मुदतीत सादर केलेले नाही अशा २७२ उमेदवारांची यादी या कार्यालयास सादर केलेली होती.

४. त्यानुसार मोहाडी, लाखांदूर, साकोली, भंडारा, लाखनी, पवनी व तुमसर येथिल ग्रामपंचायत निवडणूक जुलै २०१५, मधील निवडणुक लढविलेल्या उमेदवांराना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४ ब मधील (१) तरतुदीनुसार निरर्ह का ठरविण्यात येवू नये, याबाबत खुलासा करण्याकामी या कार्यालयाचे नोटिस क्रमांक अका-ग्रापंनि-कावि-६६-२०१६ दिनांक ६ फेब्रुवारी २०१६ नुसार १५ दिवसाचे आंत स्पष्टीकरण सादर करण्यास नोटिस बजावण्यात आलेली होती.

५. २७२ उमेदवारापैकी श्रीमती निशा योगेश्वर थोटे, श्री. हौसीदास जागो दिघारे, श्रीमती मुन्नी धम्मदीप गजभिये, श्रीमती ललीता धनराज मडावी व श्रीमती प्रगता कपिल खोब्रागडे या पाच उमेदवारांनी दोन्ही प्रभागामध्ये नामनिर्देशन पत्र भरली आहेत. तर श्री. मिलींद राजाराम बडगे व श्रीमती मिराबाई रामदास साव या २ उमेदवारांचा मृत्यू झाल्याने त्याचे मृत्यू प्रमाणपत्र कार्यालयास प्राप्त झालेले आहे. अशाप्रकारे एकूण २६५ उमेदवारापैकी ४३ उमेदवारानी खुलासा सादर केले असून त्यांचा खुलासा संयुक्तिक व पुराव्यानिशी नसल्याने ग्राहय धरता येणार नाही. व उर्वरित २२२ उमेदवारांना खुलासा सादर करण्याची संधी देवून देखील त्यांनी खुलासा सादर केलेला नाही.

६. त्याअर्थी, मी धीरज कुमार, जिल्हाधिकारी, भंडारा मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन सोबत जोडलेल्या यादीतील २६५ उमेदवारांनी निवडणुकीत केलेल्या खर्चाबाबतचा हिशोब विहित रितीने शपथपत्रासह विहित मुदतीत सादर न केल्यामुळे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४ ब (१) चे तरतुदी अन्वये सदरचा आदेश पारित झाल्याचा दिनांकापासून त्यांना ग्रामपंचायत सदस्य राहण्यास किंवा असा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास पुढील ५ वर्षासाठी निरर्ह ठरवित आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | तालुका | ग्रामपंचायतीचे नांव | निरर्ह ठरविण्यात आलेल्या उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | तुमसर | पौनारखारी | मुकेश तुकाराम वाढीवे |
| २ | | | संतोबाई श्रीराम उईके |
| ३ | | | ममता उमेश उचीबगले |
| ४ | | | घनशाम हिरदेशी उईके |
| ५ | | | मनोहर व्यंकटी झोडे |